

# हितगुज

**मतिमंदत्व आणि लैंगिकतेच्या विविध पैलूंचे...**

अंक आठवा
सप्टेंबर-ऑक्टोबर २०१९

## या अंकात काय दडलंय...?


- **मतिमंदत्व आणि लैंगिकता**
  मतिमंद मुलं- मुली आणि लैंगिकता
- **'स्वीकार आधार गट डायरी'**
  शरीर साक्षरता सर्वांसाठी
- **प्रश्न मनातले...**
- **आपले अनुभव**
  - लैंगिक शिक्षण महत्वाचे- वंदना रेवतकर
  - पत्रास कारण की... - श्रीकांत ब्रम्हे
- **माहितीच्या जगात**
  Violence No More स्त्रियांवरील हिंसेविषयी सर्व काही


**प्रिय पालक, शिक्षक आणि कार्यकर्ते,**

सर्वांना मनःपूर्वक नमस्कार! मध्यंतरी किती घडामोडी घडल्या नाही का! म्हणजेच उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच पिण्याच्या पाण्याचा गंभीर झालेला प्रश्न, दुष्काळाच्या जाणवणाऱ्या झळा, त्यातही अपेक्षित कालावधीनंतरही पाऊस पडण्याची चिन्ह दिसत नव्हती. आता महाराष्ट्रात तीव्र दुष्काळाची स्थिती निर्माण होते की काय अशी भीती वाटत होती. पुरेसा पाऊस पडण्याची शाश्वती वाटत नसतानाच पावसाने देशातील काही राज्यांना आणि महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांना अक्षरशः झोडपून काढलं. कुठे पूर तर कुठे महापूर...आणि त्यातही काही भाग तहानलेलाच. एकीकडे पाण्यात माणसं, जनावरं वाहून चाललीयेत तर दुसरीकडे भर पावसाळ्यात तहान भागवण्यासाठी टँकर सुरुच. किती ही विसंगती... याला निसर्गाचा प्रकोप म्हणावा की मनुष्यानं स्वतः ओढवून घेतलेलं संकट? वेळीच सावध होणं गरजेचं आहे.

आणि हो, चांद्रयान-२ पृथ्वीवरून अवकाशात झेपावलं, भारतानं एक यशस्वी पाऊल पुढं टाकलं आणि एका नवीन शोधाच्या दिशेनं वाटचाल सुरु केली. एकीकडं किती नवीन बदलांकडं, यशाकडं आपला प्रवास सुरु आहे तर दुसरीकडे मात्र आपण तसूभरही हलण्याचा प्रयत्न करत नाहीये. म्हणजेच जो समाज दैदीप्यमान यशाला गवसणी घालतोय, नवीन बदलांची, विकासाची स्वप्न पाहतोय तोच समाज लैंगिकतेसारख्या नैसर्गिक गोष्टीला मोकळेपणाने स्वीकारताना दिसतोय का? त्यातही अपंग, मतिमंद किंवा विशेष क्षमता असणाऱ्या मुला-मुलींच्या/ व्यक्तींच्या लैंगिकतेकडे तर आपण पूर्णपणे दुर्लक्षच केलेलं आहे. पण स्वीकाराच्या, बदलांच्या आणि समानतेच्या पाउलखुणा आपल्या विशेष मुलांच्याही आयुष्यात उमटाव्यात असे स्वप्न आपण सर्वांनी पाहिले आहेच. ते यशस्वीपणे साकारण्यासाठी अधिक ताकदीने प्रयत्न करूयात.

हितगुजचा आठवा अंक तुमच्या पर्यंत पोहचवत आहोत. लैंगिक अभिव्यक्ती हा प्रत्येकाचा अधिकार आहे मग ती व्यक्ती मतिमंद असो किंवा सामान्य. म्हणूनच मतिमंद मुला-मुलींच्या लैंगिक अधिकारांबद्दल बोलणारा लेख 'मतिमंदत्व आणि लैंगिकता' या सदरामध्ये दिला आहे. मतिमंद मुलग्यांसोबत 'शरीर साक्षरता सर्वांसाठी' हा कोर्स आम्ही घेतलेला तुम्हाला माहितीच आहे. त्यातील अनुभव आणि त्याविषयीची माहिती 'स्वीकार आधार गट डायरी' मध्ये दिली आहे. प्रश्न मनातले या सदरामध्ये मतिमंदत्व आणि लैंगिकता याबद्दल असणारे काही प्रश्न व त्यांची उत्तर दिली आहेत. तसेच 'आपले अनुभव' या सदरामध्ये वंदना रेवतकर आणि श्रीकांत ब्रह्मे या पालकांनी त्यांचे अनुभव मांडलेआहेत. माहितीच्या जगात या सदरात तथापि ट्रस्ट निर्मित ViolenceNoMore.in या वेबसाईटबद्दल माहिती देत आहोत.

**नोट-'मतिमंदत्व आणि लैंगिकते'सारखा संवेदनशील मुद्दा घेऊन काम करणं हा खूप खडतर प्रवास आहे. यामध्ये आम्हाला तुमच्यासारखे पालक, शिक्षक आणि कार्यकर्त्यांचा नेहमीच सहभाग मिळाला आहे. कामातील घडामोडी, नवीन बदल, माहिती हितगुजच्या माध्यमातून आम्ही तुमच्यापर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न करतच असतो. पण कधी कधी असे वाटते की हा संवाद एकतर्फीच होतोय. म्हणजेच तुमचे अभिप्राय, मत आमच्यापर्यंत पोहचतच नाही. तुम्हीही आमच्याशी संवाद साधू शकता तुमच्या लिखाणाच्या, अनुभवांच्या, कामातील घडामोडींच्या माध्यमातून. विशेष मुलाचे पालक, शिक्षक किंवा भावंडं, कार्यकर्ते म्हणून तुमचे अनुभव, योगदान, प्रयत्न याबद्दल आम्हालाही जाणून घ्यायला आवडेल. तर लिहाल ना?...**

संवाद अधिक प्रभावीपणे होण्यासाठी आम्ही या अंकामध्ये तुमच्यासाठी एक स्पर्धा घेऊन आलो आहोत. यामध्ये एका किशोरवयीन मतिमंद मुलाची गोष्ट असून ती अपूर्ण आहे. तुम्हाला ही गोष्ट पूर्ण करून आम्हाला पाठवायची आहे. या स्पर्धेतील विजेत्यांसाठी आकर्षक बक्षिसही असणार आहे.

तुम्ही या अंकाच्या प्रतिक्रिया मेल करू शकता किंवा व्हॉटस ॲप वर पाठवू शकता.

Email : tathapi@gmail.com
Mobile : 7387598645 (व्हॉटस ॲप)

हितगुजच्या या अंकाबद्दल तुमचं मत, आवडलेली किंवा न आवडलेली गोष्टही आम्हाला नक्की कळवा. तुमच्या प्रतिसादाची वाट पाहत आहोत...

आपले
**सुषमा, अच्युत**
**आणि तथापि टीम**

# मतिमंद मुल-मुली आणि लैंगिक अधिकार

**मतिमंद मुलांमध्ये लैंगिक भावनाच निर्माण होऊ नयेत म्हणून त्या प्रकारची औषधे मुलांना द्यावीत अशी मागणी पालक शिक्षकांकडे करत असतात. तर काही वसतिगृहांमध्ये अशा 'औषधांचा' वापरही केला जात आहे. याबाबत डोळसपणे विचार करणं, त्याचे उपाय आणि अपाय समजून घेणं, अशा औषधांच्या वापरातून खरंच निकोप पद्धतीने या भावना हाताळल्या जात आहेत का याचाही विचार आपण करायला पाहिजे.**




**तथापि प्रकाशन २०१६**
**किंमत : रु. २००/-**

मतिमंद मुला-मुलींचे लैंगिक अधिकार, लैंगिक आरोग्य हा विषय खूप महत्वाचा असला तरी तो अजूनही दुर्लक्षितच राहिला आहे. मुळात लैंगिकता या विषयाबाबत समाजात अपराधीपणा, घृणा, नैतिक-अनैतिक आणि अनेक नकारात्मक छटा दिसतात. लैंगिक भावना, अधिकार, लैंगिक आरोग्य हे घटक सामान्य व्यक्तींच्या बाबतीतही मोकळेपणाने लक्षात घेतले जात नाहीत तर अपंग व्यक्तींबाबत उपेक्षितता, दुरावस्था आढळणं आश्चर्यकारक नाही. पण एकविसाव्या शतकातही आपण मागासलेल्या विचारांमध्येच अडकून आहोत हे खंत वाटणारं नक्कीच आहे. लैंगिकतेबाबत मोकळेपणाने बोलणं दूरच, पण विचार करतानाही आपण संकुचित होतो. लैंगिकतेबाबत बोलणं, चर्चा करणं हे गैर आणि अनैतिक आहे, किंबहुना हेच अश्लील आहे, अशी धाटणी बनली आहे. त्यामुळे लैंगिक भावना, समस्या आणि त्याचं निराकरण करणं दूर राहतं आणि परिणामी या समस्या अधिक जटील होत जातात.

लैंगिकता हा प्रत्येकाच्या आयुष्याचा एक महत्वाचा घटक आहे. ती एक नैसर्गिक प्रेरणा आहे. बौद्धिक किंवा शारीरिक क्षमता कमी असणाऱ्या, तसेच कोणतेही अपंगत्व असलेल्या प्रत्येक व्यक्तीला त्यांचे लैंगिकतेबद्दलचे विचार, भावना व्यक्त करण्याचा अधिकार आहे. पण अनेकदा एकूण अपंगत्वाबद्दलचा हीन दृष्टीकोन, वाढती असुरक्षितता अशा कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे घरातून, समाजातून या मुलांचे लैंगिक अधिकार नाकारले जात असतात. त्यामुळे लैंगिक आनंद, समाधान यापासून मतिमंद व्यक्ती वंचित राहतात. मतिमंद मुला-मुलींना त्यांच्या लैंगिक भावना व्यक्त करण्यात सामाजिक संकेतांचे, नीती- नियमांचे अडथळे आणून आपण त्यांची भावनिक घुसमट करत आहोत का? समलिंगी संबंधांना विरोध करणं, मुला-मुलींचे लैंगिक भावनांचे उद्दीपन थांबावे म्हणून औषधांची विचारणा करणं, तसे प्रयोग करून करून पाहणं यातून त्यांच्या लैंगिक अधिकारांचे उल्लंघन करत आहोत का याबद्दल स्वतःच स्वतःला प्रश्न विचारणं, विचार करणं आणि योग्य दिशेनं पाऊल उचलणं गरजेचं आहे. मतिमंद व्यक्तींनाही निकोप आणि सुरक्षित लैंगिकतेचा आनंद अनुभवता यावा यासाठी एक पालक म्हणून सुरक्षित स्पेस निर्माण करणं गरजेचं आहे.

मतिमंद मुलांमध्ये लैंगिक भावनाच निर्माण होऊ नयेत म्हणून त्या प्रकारची औषधे मुलांना द्यावीत अशी मागणी पालक शिक्षकांकडे करत असतात. तर काही वसतिगृहांमध्ये अशा 'औषधांचा' वापरही केला जात आहे. याबाबत डोळसपणे विचार करणं, त्याचे उपाय आणि अपाय समजून घेणं, अशा औषधांच्या वापरातून खरंच निकोप पद्धतीने या भावना हाताळल्या जात आहेत का याचाही विचार आपण करायला पाहिजे.

लैंगिक जबरदस्ती किंवा छळ आणि आवडणाऱ्या व्यक्तीसोबत संमतीतून केलेले लैंगिक संबंध यातला फरक समजावून सांगणं गरजेचं ठरेल. मिठीत घेणं, कुरवाळणं, हस्तमैथुन, हातात हात घेणं यादेखील आनंददायी लैंगिक क्रियाच आहेत. त्यातून त्यांना लैंगिक आनंद घेता यावा यासाठी देखील प्रयत्न करणं गरजेचं आहे.

**एका मतिमंद मुलाची आई सांगते...**

*'माझा मुलगा आता तसा मोठा झाला. त्याला लैंगिक भावना येतातच. मग तो रात्री काही ना काही उद्योग करत असतो. काही ना काही चाळे सुरूच असतात. माझे मिस्टर काय करायचे, तो खोलीत असताना असं काही करायचा तर ते त्याला काठी घेऊन दरडवायचे'. पण अनुभव असा आहे की ह्या गोष्टी करताना मुलांना विरोध केला की ते आक्रमक होऊ शकतात. तर यावर एका डॉक्टरांना विचारल तर त्यांचं म्हणणं आहे की त्याला हे करू द्या. तेव्हाच त्याला समाधान मिळेल आणि त्याच्यातील आक्रमकता कमी होण्यास मदत होईल.*

मतिमंद मुला-मुलींना लैंगिक संबंध किंवा कृतींसाठी स्पष्टपणे संमती व्यक्त करण्यात अडचण येत असेल तर यामध्ये पालकांची संमती असणं महत्वाचं ठरेल. पालकांनीही आपल्या मुला-मुलींची इच्छा, आवड-निवड, शारीरिक, मानसिक आरोग्याची काळजी या गोष्टींची जाणीवपूर्वक दखल घ्यायला हवी.

**शरीर साक्षरता सर्वांसाठी (मतिमंद मुला-मुलींच्या पालक व शिक्षकांसाठी) या पुस्तकातून साभार**

# शरीर साक्षरता सर्वांसाठी...

सुषमा खराडे

**मुलांच्या क्षमतेनुसार, त्यांना समजेल अशा पद्धतीने वयात येणं, शारीरिक स्वच्छता, सुरक्षितता, लैंगिकता याविषयी खरंच संवाद साधला जातो का? कमीत कमी त्यांना येणाऱ्या समस्या किंवा अडचणी तरी समजून घेतल्या जातात का? आणि त्यासाठी काही विशेष प्रयत्न केले जातात का?...**



प्रत्येकालाच आपल्या शरीराविषयी अचूक माहिती जाणून घेण्याचा अधिकार आहे. मग विशेष मुलंच याला अपवाद का आहेत? म्हणजेच त्यांच्या क्षमतानुसार, त्यांना समजेल अशा पद्धतीने वयात येणं, शारीरिक स्वच्छता, सुरक्षितता, लैंगिकता याविषयी खरंच संवाद साधला जातो का? कमीत कमी त्यांना येणाऱ्या समस्या किंवा अडचणी तरी समजून घेतल्या जातात का? आणि त्यासाठी काही विशेष प्रयत्न केले जातात का?... असे एक नाही अनेक प्रश्न आहेत आणि खोलात जाऊन पाहिलं की लक्षात येतं सामान्य मुलांनासुद्धा शरीर साक्षरतेच्या प्रवाहात आणताना कितीतरी अडथळे जाणवतात. तर विशेष मुलांच्या बाबतीत हा प्रवास किती खडतर असेल याची कल्पना येते. त्यांनादेखील सर्वांसारखे अधिकार आहेत आणि त्यांना ते मिळावेत यासाठी आपणा सर्वांकडून विशेष प्रयत्न होणं गरजेचं आहे.

असाच एक प्रयत्न तथापिने केला आहे. वयात आलेल्या विशेष मुलग्यांसोबत (सात मुलांचा ग्रुप) ‘शरीर साक्षरता सर्वांसाठी’ या कोर्सच्या माध्यमातून आम्ही संवाद साधला. एकूण आठ सत्रांमध्ये हा कोर्स विभागलेला आहे. मागील हितगुजच्या अंकामध्ये या कोर्सविषयी माहिती दिलीच आहे. या कोर्सच्या माध्यमातून ‘वयात येणं, शारीरिक स्वच्छता, हस्तमैथुन, सुरक्षितता, खाजगीपणा’ याविषयी मुलांसोबत संवाद साधण्याच्या प्रयत्नांची सुरुवात झाली. एक निश्चित दृष्टीकोन समोर ठेऊन या मुलांना एकत्रित घेऊन आम्ही एका दिशेने वाटचाल सुरु केली आहे. मुलांच्या कलानं, तज्ज्ञांच्या मदतीनं आणि पालकांच्या सोबतीनं आम्ही एक पाऊल पुढे गेलो हे नक्कीच.

प्रत्येक सत्रामध्ये या मुलांनी आपापल्या क्षमतांनुसार विषय समजून घेण्याचा प्रयत्न केला. सुरुवातीला सर्वच गोष्टी मुलांच्या लक्षात राहतील असेही नाही. जेव्हा कधी आम्ही या मुलांसोबत याविषयी बोलतो तेव्हा मुलं शारीरिक, लैंगिक अवयवांची नावं अचूक सांगतात, शारीरिक स्वच्छतेविषयी देखील बोलतात. त्यांच्याशी असणाऱ्या संवादात सातत्य असणं देखील गरजेचं आहे. म्हणजेच जेव्हा मुलं घरी असतात तेव्हा सत्रांमध्ये ते काय शिकले, त्यांच्या कितपत लक्षात राहिले हे पाहणं आणि एखादी गोष्ट त्यांच्या लक्षात राहत नसेल तर ती पुन्हा पुन्हा सांगत राहाणं, त्याविषयी मुलांशी संवाद करत राहणं ही पालकांची जबाबदारी आहे. यामुळे मुलांना शिकलेल्या गोष्टी अनुकरणात आणण्यास सहजता येईल किंवा मदत होईल. पालकांना देखील स्वतःच्या विचारांवर, भावनांवर काम करणं आणि तशी स्पेस शोधणं आवश्यक आहे. जेणेकरून मुलांचं वयात येणं हा काळजीचा विषय न राहता ते प्रत्यक्ष मुलांनाच योग्य रितीने कसं हाताळता येईल यावर काम करणं सोपं जाईल.

या कोर्समधील शेवटचे सत्र आम्ही साधना व्हिलेज या ठिकाणी घेतले. यामुळे साधना व्हिलेजच्या प्रमुख मेधाताई टेंगशे यांच्यासोबत पालकांना चर्चा करता आली. पालकांचे काही प्रश्न, अनुभव त्यांनी ताईंसोबत शेअर केले. साधना व्हिलेजची माहितीही पालकांना घेता आली. सत्रासोबतच मुलांना तिथले वातावरणही अनुभवता आले. साधना व्हिलेजचा संपूर्ण परिसर मुलांनी पाहिला आणि तिथल्या काही मतिमंद व्यक्तींची भेटही झाली. गाणी म्हणत, नाच करत म्हणजेच स्वतःमधील कलागुण दाखवत मुलांनी शेवटी धमालही केली.

खरंतर या एकूण सत्रांदरम्यान पालक आणि मुलांसोबत संवादापलीकडचं एक नातं तयार झालं ज्यामध्ये मुलांना व्यवस्थितपणे समजून घेता आलं. त्यांनाही व्यक्त होण्याची संधी/जागा मिळाली. या मुलांचं आणि पालकांचं खरंच खूप कौतुक करावसं वाटतं...कारण त्यांचा सहभाग आणि साथ यामुळेच हे शक्य झालं. डॉ. सचिन नगरकर आणि डॉ. वसुधा गोखले यांचे प्रयत्न आणि मार्गदर्शन हा कोर्स प्रत्यक्षात येण्यास महत्त्वाचं ठरलं.

# प्रश्न मनातले

लैंगिकता किंवा लैंगिक शिक्षण म्हटल की अनेकांच्या मनात नकारात्मक विचारच आधी येतात. याविषयी बोलायचं म्हटलं तरी तसा मोकळेपणाही नाही, समाजात आणि मनातही. लैंगिक भावना ही नैसर्गिक आहे आणि प्रत्येकाच्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. तरीही त्याबद्दल कितीतरी चुकीचे समज घेऊन आपण जगत असतो. बहुतेक लोकांना हवीहवीशी वाटणारी, आनंद देणारी ही भावना काहीतरी घाणेरडं किंवा पाप यांच्या नावाखाली दडपून टाकली जाते. सर्वसामान्य गणल्या जाणाऱ्या व्यक्तीबाबतच जर अशी स्थिती असेल तर मतिमंद, अपंग असणाऱ्यांच्या लैंगिक अभिव्यक्तिचा प्रश्न किती मोठा असेल याचा अंदाज येतोच. मतिमंद मुलांना त्यांच्या लैंगिक भावना योग्य पद्धतीने हाताळण्यास मदत केली, तसे प्रशिक्षण दिले तर ते देखील स्वतःचे आयुष्य आनंदी आणि निकोपपणे जगू शकतील. परंतू आधी स्वतःच्या लैंगिकतेचा आपण निःसंकोचपणे स्वीकार केला तरच आपण इतरांच्या लैंगिकतेबद्दलचा आदर करू शकतो, स्वीकार करू शकतो.

वर्षानुवर्षे चालत आलेले विचार, रूढी यांच्या विळख्यात आपण इतके अडकलेले असतो की स्वतःला पडणारे लैंगिकतेबद्दलचे प्रश्न, जाणवणाऱ्या समस्या या मनात तशाच राहतात त्यावर उत्तर शोधण्याचा प्रयत्न होत नाही किंवा तशा जागाही फार कमी आहेत. प्रश्न निर्माण होतंच असतात पण त्याविषयी बोललं पाहिजे, उत्तर शोधली पाहिजेत. मतिमंदत्व आणि लैंगिकतेविषयीचे काही प्रश्न आणि त्यांची उत्तरं 'प्रश्न मनातले' या सदरामध्ये दिली आहेत.

**१. लैंगिक भावना म्हणजे काय?**

एखादया आवडत्या व्यक्तीबद्दल आकर्षणाच्या सर्व भावना ज्या आपल्याला स्पर्शातून, जवळीकीतून, हातात हात घेऊन किंवा चुंबन घेऊन किंवा इतर मार्गाने व्यक्त कराव्याश्या वाटतात त्या सर्व भावनांना लैंगिक भावना म्हणतात.

**२. मतिमंद मुलं- मुली लैंगिक संबंध करू शकतात का?**

मतिमंद मुलं-मुली लैंगिक संबंध करू शकतात. पण संभोग क्रिया त्यांना जमेलच असं नाही. त्यासाठी त्यांना प्रशिक्षणाची गरज असते. तसंच मतिमंद जोडप्यांनाही लैंगिक संबंध कसे करावेत, लैंगिक आरोग्यासाठी स्वच्छता कशी राखावी याबद्दलच्या प्रशिक्षणाची गरज असते.

मिठीत घेणं, कुरवाळणं, चुंबन घेणं, एकमेकांचे हात हातात घेणं हेदेखील आनंददायी लैंगिक संबंधच आहेत आणि या क्रिया या मुला-मुलींना करता येतात.

**३. हस्तमैथुन म्हणजे काय?**

मुलग्यांमध्ये लिंगाला सारखा हात लावावा असं वाटू लागतं. लिंगाला हात लागला, लिंग घासलं गेलं तरी ते ताठ व्हायला लागतं आणि यातून एक सुखद भावना अनुभवायला मिळते. मुलींना योनीला, योनीतील संवेदनशील क्लिटोरिसला हात लावला, ते घासलं किंवा स्तनांना स्पर्श करून लैंगिक आनंद अनुभवता येतो. यालाच हस्तमैथुन असं म्हणतात. लैंगिक भावना निर्माण झाल्या की शरीराला आणि मनाला चांगल वाटू शकतं. पण सतत तेच करत राहणं मात्र योग्य नाही. तसं होत असेल तर तज्ञांच्या सल्ल्याची/ मार्गदर्शनाची गरज असते.

**४. लैंगिक कल म्हणजे काय?**

अनेक मुलांना भावनिक आणि लैंगिक आकर्षण फक्त मुलींबद्दल वाटतं. अनेक मुलींना लैंगिक किंवा भावनिक आकर्षण फक्त मुलांबद्दल वाटतं. याचा अर्थ या मुलांचा किंवा मुलींचा लैंगिक किंवा भावनिक आकर्षणाचा कल विरुद्ध लिंगाच्या व्यक्तीकडे असतो. अशा विरुधलिंगी व्यक्तीकडे असणाऱ्या लैंगिक किंवा भावनिक कलाला 'भिन्नलिंगी कल' म्हणतात. इंग्रजीत याला हेटरोसेक्शूअल म्हणतात.

काही मुला-मुलींना दोन्ही लिंगाच्या व्यक्तींबद्दल भावनिक व शारीरिक आकर्षण वाटतं. मुलींना मुलं आणि मुली दोघांबद्दल लैंगिक आणि भावनिक आकर्षण वाटतं आणि मुलांना देखील मुला आणि मुली दोघांबद्दल लैंगिक आणि भावनिक आकर्षण निर्माण होतं. अशा आकर्षणाला 'उभयलिंगी कल' असं म्हणतात. उभयलिंगी कल असणाऱ्या व्यक्ती गोंधळलेल्या असतात असा मात्र याचा अर्थ होत नाही. एका व्यक्तीला एकाच लिंगाच्या व्यक्तीबद्दल आकर्षण वाटलं पाहिजे असा काही निसर्गाचा नियम नाही.

काही मुला- मुलींना केवळ त्यांच्याच लिंगाच्या व्यक्तीबद्दल लैंगिक आकर्षण वाटतं. म्हणजेच मुलांना फक्त मुलांबद्दल आणि मुलींना फक्त मुलींबद्दल लैंगिक, भावनिक आकर्षण वाटतं. याचा अर्थ या मुला-मुलींचा लैंगिक, भावनिक आकर्षणाचा कल समलिंगी असतो. अशा व्यक्तींना समलिंगी कलाच्या किंवा 'समलिंगी' व्यक्ती म्हणतात. इंग्रजीत समलिंगी मुलांना किंवा पुरुषांना गे म्हणतात तर समलिंगी मुली किंवा स्त्रियांना लेस्बियन म्हणतात.

कोणत्याही व्यक्तीबाबत निर्माण होणारं लैंगिक आकर्षण नैसर्गिक आहे. त्यात चुकीचं असं काहीही नाही.

# लैंगिक शिक्षण-महत्त्वाचे

-वंदना रेवतकर



वंदना रेवतकर

मी एका विशेष मुलाची आई आहे. माझा मुलगा आता वयात यायला लागलाय. त्यामुळे सर्वच पालकांप्रमाणे माझ्याही मनात त्याविषयीची काळजी, चिंता आणि प्रश्न आहेतच. हा मुद्दा घेऊन पालकांना व्यक्त होता येईल अशी योग्य जागा मिळणं फार गरजेचं आहे असं मला वाटतं. तथापि ट्रस्टने सुरु केलेल्या 'शरीर साक्षरता सर्वांसाठी' या कोर्सविषयी मला समजले तेव्हा स्वतःच्या शरीराविषयी माहिती जाणून घेण्याचा हा विशेष मुलांसोबतचा संवाद असल्याने त्याबद्दल उत्सुकता होती. यामध्ये मुलांसाठी असणाऱ्या सत्रांबरोबरच पालकांसोबतही चर्चा होती त्यामुळे ही संकल्पना फार छान वाटली. मी आणि माझा मुलगाही या कोर्सचा भाग झालो आणि एक वेगळा अनुभव आम्हाला मिळाला.

मतिमंद मुलं-मुली मोठी व्हायला लागली की निसर्ग नियमाप्रमाणे होणाऱ्या शरीरातील बदलांमुळे त्यांच्याही वागण्यात बदल जाणवायला लागतात. वयात येण्याचा हा संवेदनशील टप्पा असतो त्यामुळे त्यांच्याशी कसं वागावं, कसा संवाद साधावा हे बऱ्याचदा पालकांना कळत नाही. सामान्य मुलांच्या बाबतीत म्हटलं तर बघून, ऐकून, वाचून त्यांना या गोष्टी बऱ्यापैकी समजतात पण विशेष मुलांना याविषयी सांगणं किंवा शिकवणं त्यामानाने अवघड आहे. म्हणून अनेक समस्यांचा सामना पालकांनाही करावा लागतो. समाजामध्ये असा गैरसमज आहे की, याविषयी बोललं किंवा मुलांना सांगितलं तर मुलं बिघडतात. परंतू लैंगिकता ही लपवून ठेवण्यासारखी गोष्ट नाहीये. मुलांना योग्य वयात योग्य शिक्षण मिळालं की तेही स्वतःची लैंगिकता योग्य पद्धतीने हाताळू शकतात. यासाठी सर्वांचा दृष्टीकोन बदलणे गरजेचे आहे. लैंगिक शिक्षण किंवा लैंगिकतेबाबत सर्वांनीच साक्षर असणं गरजेचं आहे.

'शरीर साक्षरता सर्वांसाठी' या कोर्समध्ये मुलांचं वयात येणं, शारीरिक अवयवांची ओळख, शारीरिक स्वच्छता, खाजगीपणा, स्पर्श, सुरक्षितता याविषयी मुलांसोबत बोललं गेलं. विविध चित्रांच्या, रोल प्ले च्या, खेळांच्या माध्यमातून मुलांना माहिती दिली गेली. संवादाची ही माध्यमं उपयोगी वाटली आणि मुलांना समजण्यास सोपे गेले.

**शब्दांकन: सुषमा खराडे**

## पत्रास कारण की...

-श्रीकांत ब्रम्हे

डॉ. सचिन नगरकर
अच्युत
सुषमा
तथापि संस्था, पुणे

यांस सप्रेम नमस्कार,

मुद्दाम लिहिण्याचे कारण की, तथापि बाबतची माहिती नरेंद्रच्या (माझा मुलगा) दिलासा शाळेतील आयोजलेल्या कार्यक्रमात समजली. गेली २-३ वर्षे मी 'स्वीकार आधार गटा' च्या माध्यमातून तथापि संस्थेसोबत जोडला गेलो आहे. तथापिचे काम खरंच खूप चांगले आहे. तथापिमधील पालक व विशेष मुला-मुलींबद्दलची आपुलकी व त्यांच्या कलाने शिकविण्याची, समजून सांगण्याची पद्धत अतिशय छान आहे. आपण सर्वजण हे काम मनापासून करत आहात त्याबद्दल आपणा सर्वांचे अभिनंदन.

महाराष्ट्रभर तसेच पुण्यातही मतिमंद मुलांसाठी काम करणाऱ्या अनेक संस्था आहेत. परंतू मतिमंद मुलांच्या लैंगिकतेच्या मुद्याला घेऊन काम करणं हे तथापिच वेगळेपण आहे असं मला वाटतं. पालकांच्या शंका, अडचणी व्यवस्थितपणे समजून घेतल्या जातात. स्वतःच्या शरीराबद्दल मुला- मुलींना शिकविणे तसे अवघड काम आहे. तथापिने डॉ. सचिन नगरकर आणि वसुधा गोखले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्यक्ष मुलग्यांसोबत शरीर साक्षरतेवर संवाद साधला. यांतर्गत विविध खेळांच्या व प्रत्यक्ष कृतीच्या माध्यमातून माहिती दिली. खरंच ही छान सुरुवात आहे. असा उपक्रम पुन्हा नक्की करावा.

# १. भावंडांचं भावविश्व

विशेष मुलांच्या पालकांसोबत संवाद साधत असताना त्यांच्यावर असलेली जबाबदारी आणि त्यातून येणारी अगतिकता, हतबलता, आणि मानसिक ताण- तणाव यांची जाणीव झाली. प्रत्येकाला व्यक्त होता येणं आणि त्यासाठी योग्य जागा मिळणं याची गरज पालकांसोबतच्या सत्रांतून/ संवादातून लक्षात आली. पालकांना मन मोकळं करता यावं आणि त्यांना अनुभवांची देवाण- घेवाण करता येणं सोपं व्हावं हा हेतू समोर ठेऊन जास्तीत जास्त पालकांपर्यंत पोहचण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत.

मतिमंद मुलाचं सर्वसाधारण भावंड असेल तर तेही प्रत्यक्ष/ अप्रत्यक्षरित्या या विशेष जबाबदाऱ्यांचा एक भाग बनलेलं असतं. या परिस्थितीतील त्याची/ तिची भूमिका महत्वाची असते. म्हणून त्यांच्यापर्यंत पोहचण्याचा, त्यांचे प्रश्न, अनुभव समजून घेण्याचा आमचा मानस आहे.

विशेष मूल व सोबत त्याची सर्वसाधारण भावंडं ह्यांना एकत्र सांभाळणं म्हणजे पालकांची तारेवरची कसरत असते. विशेष मुलाच्या गरजा सामान्य मुलापेक्षा जास्त असतात म्हणून नेहमी त्याच्याकडे पालकांचा जास्त कल असू शकतो. त्यामुळे दुसरी भावंडं मात्र तक्रार करत असतात की, आईबाबा आमच्यावर प्रेमच करत नाहीत. मुलं दुखावली जाऊ शकतात.

अशा वेळी दोन बाजू जाणवतात. पहिली म्हणजे विशेष मूल लहान व दुसरं भावंड मोठं असेल तर ते खूप चांगल्या प्रकारे आपल्या लहान मतिमंद भावडांला समजून घेऊ शकतं. आईबाबांनी स्वीकारलं की, तेही आपल्या भावंडाला स्वीकारतं. त्याला आईबाबांची काळजी, त्रास पटकन कळतो. बऱ्याचदा ते वेळेच्या आधीच प्रौढ होतं व पटकन त्या विशेष मुलाच्या पालकाच्या भूमिकेत येतं. परंतु कधीकधी याचा उलटा परिणाम त्या भावंडाच्या वैयक्तिक, शैक्षणिक आयुष्यावर होऊ शकतो. भावनिक दृष्ट्या अधिकच गुंतवणूक झालेली असेल तर त्याच्या स्वतःच्या आयुष्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष होऊ शकतं.

दुसरी बाजू अशी की दुसरं भावंड विशेष मुलापेक्षा लहान असतं. तिथे मात्र कायम लहान भावंडाची तक्रार असते की, आईबाबा त्याच्याकडे/ तिच्याकडे जास्त लक्ष देतात, त्याच्यावर/ तिच्यावर जास्त प्रेम करतात. कळत न कळत सामान्य मुलाला बऱ्याच गोष्टींमध्ये गृहीत धरले जाते. अशावेळी सर्वसामान्य भावंडांच्या अपेक्षा पूर्ण न झाल्यास किंवा काही बाबतींत दुर्लक्ष झाल्यास मग त्यांची चिडचिड, त्रागा सुरू होतो. बरेचदा त्यांच्या मनात याबद्दल आयुष्यभर राग राहू शकतो. यातून काही नकारात्मक वर्तन त्यांचाकडून होऊ शकते, व त्याच्याही आयुष्यावर या गोष्टींचा नकारात्मक परिणाम होऊ शकतो. विशेष मुलाच्या जन्माच्या धक्क्यातून अजून पालकच सावरलेले नसतात, त्यात पुढे भावंडाचा प्रश्न पालकांसमोर उभा राहतो.

म्हणूनच अशा काही भावंडांसोबत चर्चा करणं, त्यांना समजून घेणं, सकारात्मक दृष्टीकोन पोहचवणं आणि त्यांनाही व्यक्त होण्यासाठी एखादी जागा उपलब्ध करून देणं गरजेचं आहे. हे उद्दिष्ट समोर ठेऊन त्यांच्याशी संवाद साधण्याची सुरुवात करत आहोत.

**विचार करा आणि नक्की सांगा.**

१. मतिमंद मुलाचे भाऊ/ बहीण म्हणून तुम्हाला आलेले अनुभव कसे आहेत?

२. तुमचं विशेष भावंड आणि तुमच्यातील नातं कसं आहे?


३. तुमच्या रोजच्या आयुष्यामध्ये काही प्रश्न निर्माण होतात का?

४. तुमच्या भागामध्ये मतिमंद मुलांच्या भावंडांसाठी काही मिटिंग, कार्यक्रम झाले आहेत/ होत आहेत का?

तुमचे अनुभव, मनातील भावना, वरील प्रश्नांची उत्तरं लिहून मेल करू शकता किंवा व्हॉटस ॲप वर पाठवू शकता.

**Email- tathapi@gmail.com**
**Mo. - 7387598645 (Whatsapp)**

## तथापिचे प्रकाशन लवकरच येत आहे...



# २. आगळी वेगळी दोस्ती कार्यक्रम

अपंग किंवा मतिमंद मूल ही खरंतर त्या कुटुंबाची नाही तर संपूर्ण समाजाची जबाबदारी असते. परंतु आजची स्थिती पाहता वेगळच चित्र पाहायला मिळत. अनेक अडचणींचा सामना करत ही मुलं आयुष्य जगात असतात. त्यामुळे अशा कुटुंबांच्याही क्षमता पणाला लागलेल्या असतात. एक समाज म्हणून आपण त्यांच्या गरजांकडे कसे पाहतो, त्यांच्या बाबत आपल्या मनात स्वीकाराची भावना आहे का हे महत्वाचे ठरते. 'मतिमंदत्व आणि लैंगिकता' खूप महत्वाचा पण दुर्लक्षित असा हा विषय. हा मुद्दा घेऊन तथापि संस्था काम करत आहे. या कामातील योगदान केवळ संस्थेपुरतंच मर्यादित न राहता याला सामाजिक सहभागाची जोड आवश्यक आहे. केवळ आम्ही नाही तर तुम्ही-आम्ही मिळून एक नवीन वाटचाल नक्कीच सुरु करू शकतो. म्हणून ज्यांना प्रत्यक्ष मतिमंद मुलां-मुलींसोबत त्यांच्या घरी जाऊन त्यांच्या सोबत वेळ घालवायला, त्यांच्या आवडी निवडी जाणुन घ्यायला आवडेल, अशा व्यक्तींसाठी तथापि उपक्रम घेऊन येत आहे.

तुम्हीही कल्पना करा ना की, तुमच्या छोट्याशा योगदानानं, जबाबदार कृतीतून तुमचा थोडासा वेळ या मुलांसाठी देऊ शकलात तर हा तुम्हाला स्वतःसाठी देखील अतिशय सन्माननीय अनुभव ठरू शकेल. जेव्हा विशेष क्षमता असलेल्या व्यक्तींसोबत वेळ घालवण्यासाठी, त्यांना समजून घेण्यासाठी स्वयंसेवक म्हणून आपला वेळ देण्याचे ठरविता तेव्हा खरोखरच आपण आपला पाठिंबा, मुलांना आवश्यक असलेले लक्ष, प्रेम देऊन महत्वपूर्ण भूमिका निभावू शकता.

या उपक्रमामध्ये जास्तीत जास्त तरुण वर्गाने सहभागी होणं अपेक्षित आहे. तसेच ज्यांना मनापासून या विषयामध्ये रस आहे, याची जाणीव आहे अशा व्यक्तीदेखील सहभागी होऊ शकतात. यामध्ये तथापिच्या सहकार्याने कुटुंबाची ओळख करून घेऊन आणि त्यांच्या पूर्ण संमतीने विशेष पाल्यासोबत वेळ घालवता येईल.

तुमच्यापैकी काहींना विशेष गरजा असलेल्या व्यक्तींसोबत काम करण्याचा अनुभव असेल तर तुमचे ज्ञान आणि अनुभवांचे नेहमीच स्वागत असेल. परंतु ज्यांच्यासाठी हे क्षेत्रच नवीन आहे किंवा अद्याप या कामातील अनुभव नाही त्यांच्यासाठी एक स्वयंसेवक म्हणून काम करण्याची, शिकण्याची ही चांगली संधी असेल. या कार्यासाठी आपल्या कौशल्यांचा अधिकाधिक वापर करून आपण इथून नक्कीच सुरुवात करू शकता.

याविषयी तुमचे अभिप्राय, मतं किंवा स्वयंसेवक म्हणून या उपक्रमाशी जोडण्याची इच्छा यासंदर्भात लिहून मेल करू शकता किंवा व्हॉटस ॲप वर पाठवू शकता.

**Email- tathapi@gmail.com**
**Mo. - 7387598645**

स्पर्धेत सहभागी व्हा...!

# गोष्ट पूर्ण करा

आपले विचार, अनुभव जिवंत ठेवण्याचं प्रभावी माध्यम म्हणजे लिखाण. प्रत्यक्ष न भेटता, न बोलताही लिहिण्याच्या माध्यमातून एकमेकांशी संवाद होतो. म्हणूनच तुमच्यासाठी आम्ही अशी स्पर्धा आयोजित केली आहे ज्यामध्ये तुम्हाला लिहायचं आहे आणि बक्षिस मिळवायचंय. खाली दिलेली गोष्ट तुम्हाला अंक मिळाल्यानंतर लवकरात लवकर पूर्ण करून पाठवायची आहे. परीक्षकांचा निर्णय हा अंतिम असेल. तसेच स्पर्धेतील विजेत्यांची नावं पुढील अंकात जाहीर केली जातील. आपलं पूर्ण नाव, पत्ता, फोन नंबर लिहायला विसरू नका.

गोष्ट पाठविण्यासाठी तुम्ही कोणतंही माध्यम निवडू शकता... जसे की पत्र, व्हॉटस ॲप, इमेल ई. यासाठी आवश्यक संपर्क दिलेले आहेत. काय असावा या गोष्टीचा शेवट! विचार करा आणि गोष्ट लिहायला घ्या, गोष्टीला नावही द्यायचं आहे. उर्वरित गोष्ट पूर्ण करून तुम्ही tathapi@gmail.com वर मेल करू शकता किंवा फोटो काढून ७३८७५९८६४५ (व्हॉटस ॲप) या नंबरवर पाठवू शकता.

**एक १७-१८ वर्षांचा मतिमंद मुलगा. शाळेत येताना रोज गुलाबाचं फूल आणायचा. तो एका शिक्षिकेला ते फुल द्यायचा. शिक्षक असल्यामुळे त्याही ते फूल घ्यायच्या. पण त्या मुलाला वेगळचं वाटत होतं. एके दिवशी काय झालं शिक्षिका स्टॉप ला निघाल्या तेव्हा तो मुलगा स्टॉपपर्यंत ते फूल घेऊन आला. शिक्षिकेनी नेहमीसारखं ते घेतलं. पण बाई, बाई करत तो त्यांच्या पाठीमागेच लागला. त्याचे असे वागणे पाहून त्याही गडबडल्या, त्यांना रडायलाच आलं. आता पुढे काय करावं हे त्यांना कळेनाच.................**

# ViolenceNoMore
# स्त्रियांवरील हिंसेविषयी सर्व काही

**समाजातील प्रत्येक व्यक्तीला हिंसामुक्त, सन्मानपूर्वक जीवन जगण्याचा मुलभूत, घटनादत्त अधिकार आहे. त्या अधिकाराचं हनन होत असेल तर अन्यायाच्या विरोधात आवाज उठवण्याचा आणि याविषयी माहिती आणि मदत मागण्याचा, ती मिळवण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. या अधिकाराच्या दृष्टीनेच या वेब साइटची निर्मिती करण्यात आली आहे.**

तथापि गेली अनेक वर्षे स्त्रिया आणि आरोग्य, महिला हिंसा, शरिर साक्षरता या विषयांवरिल संसाधनं तयार करून त्यांचा प्रसार करत आहे. ज्याचा उपयोग सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना होत आहे. तथापिने मागच्या वर्षी महिला हिंसेच्या मुद्यावर सर्वांगीण माहिती उपलब्ध करून देणारी एक वेबसाईट violencenomore.in तयार केली आहे. ही वेबसाईट आजच्या घडीला हिंसेसारख्या खूप संवेदनशील मुद्द्यावर महिलांना आणि हिंसेच्या मुद्द्यावर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना उपयोगी असे महत्वाचे ऑनलाईन संसाधन बनली आहे.

स्त्रियांवरील हिंसेशी संबंधित विविध पैलूंवर माहिती उपलब्ध करून देण्याच्या आणि समाजात स्त्रियांवर होणाऱ्या हिंसेविरोधात एक सकारात्मक दृष्टीकोन तयार करण्याच्या प्रमुख उद्देशाने ही वेब साइट तयार करण्यात आली आहे. हिंसेचा सामना करणाऱ्या महिलांनी आणि कार्यकर्त्यांनी या वेबसाईटवर उपलब्ध अद्ययावत माहितीचा उपयोग हिंसा आणि अन्याय दूर करण्यासाठी करावा हा देखील या वेबसाईटचा उद्देश आहे.

हिंसा, हिंसेच्या मागची खरी कारणं, स्त्रियांच्या सन्मानपूर्वक जगण्याच्या अधिकारांवर या हिंसेचा होणारा परिणाम आणि हिंसेला प्रतिबंध यासंबंधीची माहिती इथे उपलब्ध आहे, जेणेकरून स्त्रीकडे माणूस म्हणून बघण्याचा दृष्टीकोन समाजात रुजेल. कोणत्याही स्वरुपातील हिंसा, जबरदस्ती, लैंगिक छळ, बलात्कार, छेडछाड, बालकांचं लैंगिक शोषण किंवा कुणाच्याही संमतीविरोधात केलेलं अश्लील चित्रण आणि त्याचं प्रसारण याचा वेबसाईट निषेध करते. लहान मुले-मुली आणि स्त्रियांवरील हिंसेला आणि अशा हिंसेला खतपाणी घालणाऱ्या कोणत्याही कृतीला, प्रसारणाला, चित्रणाला वेबसाईट सक्त विरोध करते. जात, धर्म, लिंग, लैंगिकता, भाषा, प्रांत, शारीरिक किंवा मानसिक क्षमता अशा कोणत्याही आधारावर केला जाणारा भेदभाव वेबसाईट मान्य करत नाही.




या साइटवरील मजकूर आणि आशय ना नफा तत्त्वावर कुणीही वापरू शकेल. असा वापर करताना, ‘स्रोत - तथापि ट्रस्ट निर्मित violencenomore.in - स्त्रियांवरील हिंसेविषयी सर्वकाही’ असा उल्लेख करावा. शिवाय त्या त्या ठिकाणी माहितीचा जो मूळ स्त्रोत दिला आहे त्यांचाही उल्लेख अवश्य करावा. साइटवरील मजकूर, चित्रं, फोटो, पोस्टर इ. आशय जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचवावा. मात्र वरीलप्रमाणे उल्लेख करूनच हे साहित्य वापरण्यात यावे.

**कृपया लक्ष द्या, ही वेबसाईट केवळ माहिती प्रसाराच्या उद्देशाने बनवली गेली आहे. वाचकांच्या प्रश्नांना किंवा शंकांना इथे उत्तरं दिली जाणार नाहीत. वेबसाइट संबंधीच्या आपल्या प्रतिक्रिया feedback@violencenomore.in या इमेल वर पाठवू शकता.**

■■■



हितगुज
मतिमंदत्व आणि लैंगिकतेच्या विविध पैलूंचे...
अंक आठवा
सप्टेंबर-आक्टोबर २०१९

• संपादक मंडळ •
कलिका मुजूमदार, मेधा टेंगशे, मेघना जोशी,
मेधा काळे, अच्युत बोरगांवकर
नयना डोळस, सुषमा खराडे

सहाय्य : श्रीमती विमलाबाई (जीजी) नीलकंठ जटार ट्रस्ट
मांडणी व मुद्रण : संस्कृती डिझायनर्स

तथापि
स्त्रिया आणि आरोग्य
संसाधन संवर्धन

तथापि ट्रस्ट, फ्लॅट क्र. १, ७३,
संगम सोसायटी, बिबवेवाडी, सातारा रोड, पुणे ४११०३७
फोन : ८२३७०२४८४९, ७७२००२१४९९
ईमेल : tathapi@gmail.com
वेबसाईट : www.tathapi.org
letstalksexuality.com

**PRINTED MATTER**

**बुक पोस्ट**

अंकातील प्रत्येक मताशी तथापि संस्था सहमत असेलच असे नाही.
अंकाचा व संस्थेचा उल्लेख करून कोणालाही या अंकातील माहितीचा वापर करता येईल.

खाजगी वितरणासाठी